जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४७२ दिनांक - ०८/११/२०२४**

अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा पुणे शहर

**बुधवार पेठ वेश्या वस्तीतुन छापा कारवाई करुन ०५ पिडीत मुलींची सुटका करुन ०४ आरोपींवर गुन्हा दाखल.**

दि.०७/११/२०२४ रोजी अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा पुणे शहर व फ्रिडम फर्म संस्थेचे एन.जी.ओ. यांना बुधवार पेठ वेश्या वस्तीत कुंटणखाना येथे काही महिलांना अडकवुन ठेवुन त्यांच्याकडुन वेश्याव्यवसाय करुन घेत असलेबाबत गोपनिय माहिती प्राप्त झाली.

सदर ठिकाणी अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्ष,गुन्हे शाखा पुणे शहर कडील अधिकारी अंमलदार व फ्रिडम फर्म संस्थेचे एन.जी.ओ.यांनी प्राप्त बातमीच्या अनुषंगाने दि. ०७/११/२०२४ रोजी बुधवार पेठ वेश्या वस्तीतील कुंटणखान्यातुन छापा करवाई करुन ०५ पिडीत मुलीची सुटका करुन कुंटणखाना मालकीणी सह इतर ०३ आरोपी असे ०४ आरोपी विरुध्द पिटा ॲक्ट कलम ३,४,५,६,७ अन्वये फरासखाना पोलीस स्टेशन गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास फरासखाना पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी करीत आहेत.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे पुणे, श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे,श्री. निखील पिंगळे यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली भरोसा सेल,विभागाच्या पोलीस निरीक्षक, श्रीमती संगिता जाधव,सहा.पोलीस फौज.राजेद्र कुमावत, महिला सहा.पोलीस फौजदार छाया जाधव, महिला पोलीस अंमलदार रेश्मा कंक, पोलीस अंमलदार इम्रानखान नदाफ, भुजबळ यांनी केली.